## <u>रे. मु. नं.१८/२०१५ मधील निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादींनी तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांच्या दाव्याचे व नि.क्र.५ च्या अर्जाचे अवलोकन केले. दाव्यातील व अर्जातील कथनांच्या अनुषंगाने असे आढळुन येते की, जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका इगतपुरी पैकी मौजे रायांबे या गांवचे शिवारातील गट नं.३०६, गट नं.३७०, गट नं.२९९ या दावा मिळकती आहेत.

३. वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाचा वंशवृक्ष खालीलप्रमाणे.

बहिरु त्रंबक बिडवे (मयत) — (मुळ पुरुष)
मुक्ताबाई — (पत्नी) — प्रतिवादी नं.४

वा—याबाई (मुलगी) (प्रतिवादी नं.५) | बबाबाई (मुलगी) (वादी) | फुल्याबाई (मुलगी)(मयत)

शशिकांत (नातू) प्रतिवादी नं.१ | भागिरथ (नातू) प्रतिवादी नं.२ | राधाबाई (नात) प्रतिवादी नं.३

४. दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या वडिलोपार्जित मालकी हक्काच्या व कब्जेवहिवाटीतील अविभक्त हिश्श्याच्या मिळकती असुन त्यात वादीचा वारसा हक्काने १/४ इतका अविभक्त हिस्सा होता व आहे.

५. दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांस वारसाहक्काने प्राप्त झालेल्या वडिलोपार्जित मालकीच्या अविभक्त हिश्श्याच्या मिळकती होत्या व आहेत. आजमितीस दावा कलम १अ व १ब या मिळकतींच्या ७/१२ उता—यासदरी प्रतिवादी नं.१ व २ ची नांवे असुन, दावा कलम १क या

मिळकतीच्या ७/१२ उता—या सदरी वादी व प्रतिवादी यांची नावे आहेत.

६. मिळकतीच्या लालसेपोटी प्रतिवादी नं.१ व २ यांनी वादींच्या अशिक्षितपणाचा, त्यांचेवरील वादीचे विश्वासाचा व आपआपसातील नातेसंबंधाचा गैरफायदा घेउन वादीचा वरील मिळकतीतील अविभक्त हिस्सा गिळंकृत करण्याच्या वाईट हेतुने शासनाने मुकणे धरणाकरिता संपादीत केलेल्या क्षेत्राचा मोबदला शासनाकडून मिळणार असल्याचे वादीस खोटे सांगुन, वर कलम १अ व १ब हया मिळकतींबाबत वादी, मुक्ताबाई बहिरु बिडवे, वाळयाबाई वामन कोरडे व राधाबाई भरत वाघ यांचेकडुन तथाकथीत विनामोबदला हक्कसोडपत्र प्रतिवादी यांचे लाभांत दि.०८.०८.२००८ रोजी प्रतिवादींनी स्वतः लिहुन, त्यावर वादीचा फसवुन अंगठयाचा ठसा घेउन मे. दुययम निबंधक सो, श्रेणी १, इगतपुरी यांचे कार्यालयात दस्त क्रं. १९०८/२००८ दि.०८.०८.२००८ अन्वये नोदंवुन घेतलेला आहे. तसेच सदरचे बेकायदेशीर दस्ताच्या आधारे दावा कलम १अ व १ब या दावा मिळकतींचे रेकॉर्डवरुन ६ड नोंद नं.३५१ ही नोंद बेकायदेशीररित्या मंजुर करुन वादीचे नांव कमी केलेले आहे.

७. दावा मिळकतीतील वादीचा अविभक्त हिस्सा प्रतिवादी नं.१ व २ यांचे लाभांत सोडण्याचे कोणतेही सबळ कारण नव्हते. प्रतिवादी नं.१ व २ यांनी तथाकथित हक्कसोडपत्रात खोटा व लबाडीचा मजकुर लिहुन, वादींची फसवणुक करुन स्वतःचे लाभांत लिहुन व नोंदवुन घेतलेले आहे. सदरचे विनामोबदला हक्कसोड पत्र बेकायदेशीर व बेअंमल असुन ते वादीवर व वादीचे दावा मिळकतीतील हिस्से अधिकारवर बंधनकारक नाही. सदरचे विनामोबदला हक्कसोडपत्राच्या आधारे प्रतिवादी नं.१ व २ यांस वादीचे दावा मिळकतीतील हिस्यांबाबत कोणतेही कायदेशीर हक्क व अधिकार प्राप्त झालेले नाही.

८. कै. बहिरु त्रंबक बिडवे यांचे कायदेशीर वारस म्हणुन दावा

मिळकती मधील वादींचा वारसा हक्काने अविभक्त हिस्सा आजही कायम आहे. सदर मिळकती अगोदरपासुनच प्रतिवादी कसत असल्याने वादीने वरील मिळकतींचे रेकॉर्डबाबत चौकशी केलेली नव्हती. वादीस वरील मिळकतींचे वाटप करुन त्यांचा असलेला हिस्सा अलग, तुटक करुन घ्यावयाचा असल्याने दि.१७.०९.२०१४ चे सुमारास वरील मिळकतींची आपापसात वाटणी करुन घ्यावी व ज्याचे त्याचे हिस्याचे क्षेत्र ज्याचे त्याचे कब्जावहिवाटीत दयावे, अशी प्रांजळ मागणी प्रतिवादीकडे केली असता प्रतिवादी नं.१ व २ यांनी वादीस सदर मिळकतीत तुझे नावाने काही रेकॉर्ड दाखव, नंतर वाटणी माग, असे सांगितले.

९. दावा मिळकतींबाबत प्रतिवादी नं.१ व २ यांचे लाभांतील विनामोबदला हक्कसोडपत्र वादींचे हिश्श्याकरिता कायदेशीर प्रक्रियाव्दारे रद्द करणेसाठी व त्यानंतर प्रतिवादी नं.१ व २ यांनी वादीचा केलेल्या विश्वासघ ाातामुळे वादीस वरील दावा मिळकती एकत्रीत ठेवणे हितावह वाटत नसल्याने दावा मिळकतीमधील वादींचा अविभक्त हिस्सा वाटपाने सरसनिरस मानाने अलग व तुटक करुन पाहिजे आहे, म्हणुन वादीने वकिलांमार्फत प्रतिवादी नं.१ व २ यांना दि.०८.१२.२०१४ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवुन आणि प्रतिवादी नं.३ ते ५ यांस तोंडी विनंती केली. सदरील नोटीस प्रतिवादी नं.१ ने स्विकारणेस नकार दिल्याने नॉट क्लेम्ड असा पोष्टाचा शेरा मारुन वादीस परत मिळालेली आहे. प्रतिवादी नं.२ यांस सदरची नोटीस मिळाल्याची पोष्टाची पोहोच पावती वादीस मिळाली आहे. प्रतिवादी नं. १ व २ यांनी नोटीसीप्रमाणे वर्तन केलेले नाही. त्यामुळे वादीस सदरचा दावा ठरावासाठी, वाटपासाठी व इतर अनुषांगिक मागण्यांसाठी मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

१०. सदरचा दावा दाखल केल्यापासुन अंतिम निकालापर्यंत बराच अवधी लागणार आहे. वादीने दावा मिळकतीतील हिस्स्याची मागणी केल्यानंतर प्रतिवादी नं.१ व २ हे वादीचा हिस्सा अधिकार डावलुन

बेकायदेशीररित्या दावा मिळकतींची विल्हेवाट लावण्याची दाट शक्यता असल्याची वादीस खात्री झालेली आहे. त्यामुळे वादीने सर दाव्यासोबत तुर्तातुर्त मनाई हुकूमाचे मागणीसाठी स्वतंत्र अर्ज दाखल केलेला आहे. सदर दाव्यात वादीस प्रायमाफेसी चांगली केस असुन, न्यायाचा तौलनिक तराजु वादीचे लाभांत आहे. अशा परिस्थितीत वादीचे लाभांत, वादीचे मागणीप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होईल. याउलट प्रतिवादींविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही.

११. प्रतिवादी क्रं.१ व २ न्यायालयासमोर हजर झाले. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.१५ अन्वये दाखल केले. वादीचा दावा व नि.क्रं.५ मनाई अर्ज व त्यातील मजकुर व मागण्या हया ख—या नाहीत, कायदेशीर नाहीत, प्रामाणिकपणाच्या नाहीत व त्या प्रतिवादींना मान्य व कबुल नाहीत.

१२. तुकडी व जिल्हा नाशिक, पोटतुकडी व तालुका इगतपुरी पैकी मौजे रायांबे ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन मिळकती गट नं.३०६ क्षेत्र हे. २—२०.६ आर अधिक पो.ख.हे. ०—९.४ आर आकार रु.३—५३ पैसे आणि गट नं.३७० क्षेत्र हे. ०—९५ आर, आकार रु.१—३१ पैसे हया मिळकती प्रतिवादी नं.१ व २ यांची आई फुल्याबाई नामदेव आंबेकर उर्फ फुल्याबाई माधव रायकर आणि वा—याबाई वामन कोरडे, श्रीमती बबाबाई पंडीत यादव आणि मुक्ताबाई मर्द महिरु बिडवे यांची वडिलोपार्जित मालकीच्या मिळकती होत्या. प्रतिवादी नं.१ व २ हे फुल्याबाई नामदेव आंबेकर उर्फ फुल्याबाई माधव रायकर हयांची मुले आहेत व असल्याने आणि मुक्ताबाई मर्द बहिरु बिडवे ही प्रतिवादी नं.१ व २ हयांची आई फुल्याबाई यांची जनक आई आणि वा—याबाई कोरडे, बबाबाई पंडीत यादव हयांची जनक आई असल्याने त्यांचे प्रेमाचे व रक्ताचे नाते असल्याने व प्रतिवादी नं.१ व २ हयांनी वादी बबाबाई पंडीत यादव, वा—याबाई वामन कोरडे, मुक्ताबाई बहिरु बिडवे

हयांना वेळोवेळी सर्वातोपरी आर्थिक मदत अडचणीचे वेळी सहायय वेळोवेळी केलेले होते व त्यांचे व प्रतिवादी नं.१ व २ हयांचे रक्ताचे नाते म्हणजेच आईची आई व आईच्या बहिणी — गावश्या असल्याने आणि प्रेमाचे नातेसंबंध असल्याने व प्रतिवादी नं.१ व २ हयांनी आजी व मावश्या हयांना वेळोवेळी आर्थिक मदत व सहायय केलेले होते व केलेले असल्याने त्यांनी व प्रतिवादी नं.१ व २ हयांचे बहिणींनी सख्या बहिणींनी म्हणजेच प्रतिवादी नं.३ ते ५ व वादी हयांनी सदरील मिळकतींमधील त्यांचे असलेले हक्क प्रतिवादी नं.१ व २ हयांचे लाभात कायमस्वरुपी सोडुन दिले व तसा हक्कसोडपत्राचा दस्तऐवज जरुर त्या स्टॅम्पवर प्रतिवादी नं.१ व २ हयांचे लाभात दि.०८.०८.२००८ रोजी लिहुन करुन व मे. दुययम निबंधक इगतपुरी हयांचे कार्यालयात अनुक्रमांक १९०८/२००८ लगत साक्षीदारांसमक्ष नोंदवुन दिलेला आहे व त्या नोंदलेल्या हक्कसोड लेख दस्तऐवजाअन्वये सक्षम महसुल अधिका—यांनी प्रतिवादी नं.१ व २ हयांचे नावाची नोंद नं.३५१ ची सदर मिळकतींचे रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ चे उता—यांस मालक, कब्जेदार व पिकपहाणी सदरात संपुर्ण चौकशी अंती वेळचेवेळी नियमीतपणे आजपावेतो प्रमाणित केलेली आहे व सदरील मिळकतीत प्रतिवादी नं.१ व २ हयांनी लेव्हलींग व दुरुस्त्या करुन व बांधबंधिस्ती करुन चांगल्या व उत्तम प्रतिच्या व पिकांच्या बनविलेल्या आहेत व त्यासाठी प्रतिवादी नं.१ व २ हयांचा बराच मोठा खर्चही झालेला आहे व आता दिवसेंदिवस मिळकतींच्या किंमती वाढत असल्याने व मिळकती चांगल्या व उत्तम प्रतिच्या बनविलेल्या असल्याने प्रतिवादी नं.१ व २ हयांचेकडुन काही अवैध आर्थिक लाभ झाला तर पहावे हया दुष्ट हेतुने खोटे मजकुराचा दावा व अर्ज वादींनी प्रतिवादींना त्रास देणेसाठी व खर्चात पाडणेसाठी वादीने मे. कोर्टाची दिशाभूल करुन काही हितसंबंधी इसमांचे चिथावणीवरुन सदरचा खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर व मुदतबाहय दावा व अर्ज दाखल केलेला असल्याने वादींचा सदरचा दावा व

अर्ज व त्यातील सर्व मागण्या हया खर्चासह रद्द करण्यात याव्यात.

१३. दाव्याचे समन्स प्राप्त होवूनही प्रतिवादी क्रं.३ दाव्यात हजर न झाल्याने त्यांच्याविरुद्ध दाव्याची एकतर्फा चौकशी होण्याबाबत दि.२९.०७.२०१५ रोजी आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

१४. प्रतिवादी क्रं.४ व ५ न्यायालयासमोर हजर झाले. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.२३ अन्वये दाखल केले. वादीचा दावा व नि.क्रं.५ मनाई अर्ज व त्यातील मजकुर व मागण्या हया ख–या नाहीत, कायदेशीर नाहीत, प्रामाणिकपणाच्या नाहीत व त्या प्रतिवादींना मान्य व कबुल नाहीत.

१५. तुकडी व जिल्हा नाशिक, पोटतुकडी व तालुका इगतपुरी पैकी मौजे रायांबे या गांवचे शिवारातील शेतजमीन मिळकती गट नं.३०६ यांसी क्षेत्र हे.२–२०.६ आर अधिक पोटखराबा हे.०–०९.४ आर, आकार रु. ३–५३ पैसे आणि गट नं.३७० यांसी क्षेत्र हे. ०.९५ आर, आकार रु.१–३१ पैसे हया मिळकती प्रतिवादी नंबर १ व २ हयांची आई फुल्याबाई नामदेव आंबेकर उर्फ फुल्याबाई माधव रायकर आणि वा–याबाई वामन कोरडे, श्रीमती बबाबाई पंडीत यादव आणि मुक्ताबाई मर्द बहिरु बिडवे यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या मिळकती होत्या. प्रतिवादी नं.१ व २ हे फुल्याबाई नामदेव आंबेकर उर्फ फुल्याबाई माधव रायकर यांची मुले आहेत व असल्याने आणि मुक्ताबाई बहिरु बिडवे ही प्रतिवादी नं.१ व २ हयांची आई फुल्याबाई यांची जनम आई असल्याने त्यांचे प्रेमाचे व रक्ताचे नाते असल्याने व प्रतिवादी नं. १ व २ हयांनी वादी बबाबाई पंडीत यादव, वा–याबाई वामन कोरडे, मुक्ताबाई मर्द बहिरु बिडवे हयांना व वादीस व वादीचे कुटूंबियांना आणि प्रतिवादी नं.३ ते ५ यांना व त्यांचे कुटूंबियांना प्रतिवादी नं.१ व २ यांनी अडचणीचे वेळी वेळोवेळी सर्वातोपरी आर्थिक मदत व सहायय वेळोवेळी केलेले होते व त्यांचे व प्रतिवादी नं.१ व २ हयांचे रक्ताचे नाते म्हणजेच आईची आई व आईच्या बहिणी–मावश्या हयांना वेळोवेळी आर्थिक मदत व

सहायय केलेले होते व केलेले असल्याने त्यांनी म्हणजेच प्रतिवादी नं.३ ते ५ व वादी यांनी व प्रतिवादी नं.१ व २ हयांच्या सख्ख्या बहिणींनी सदरील मिळकतीतील त्यांचे असलेले हक्क प्रतिवादी नं.१ व २ हयांचे लाभात कायमस्वरुपी सोडून दिलेले आहेत व तसा हक्कसोडपत्राचा दस्तऐवज जरुर त्या स्टॅम्पावर प्रतिवादी नं.१ व २ हयांचे लाभात कायमस्वरुपी सोडून दिलेले आहेत व तसा हक्कसोडपत्राचा दस्तऐवज जरुर त्या स्टॅम्पावर प्रतिवादी नं.१ व २ हयांचे लाभात दि.०८.०८.२००८ रोजी लिहुन व करुन मे.दुययम निबंधक इगतपुरी यांचे कार्यालयात अनुक्रमांक १९०८/२००८ लगत साक्षीदारांसमक्ष नोंदवुन दिलेला आहे व त्या नोंदलेल्या हक्कसोडपत्र दस्तऐवजाअन्वये सक्षम महसुल अधिका—यांनी प्रतिवादी नं.१ १ व २ हयांचे नावाची नोंद नं.३५१ ची सदर मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डला ७/१२ उता—यास मालक, कब्जेदार व पिकपहाणी सदरात संपुर्ण चौकशीअंती वेळचेवेळी नियमितपणे आजपावेतो प्रमाणीत केलेली आहे व सदरील मिळकती प्रतिवादी नं.१ व २ हयांनी लेव्हलींग व दुरुस्त्या व बांधबंधीस्ती करुन मिळकती चांगल्या व उत्तम प्रतिच्या बनविलेल्या आहेत व चांगल्या पिकांच्या बनविलेल्या आहेत व त्यासाठी प्रतिवादी नं.१ व २ हयांचा बराच मोठा खर्चही झालेला आहे. परंतु दिवसेंदिवस मिळकतीच्या किंमती वाढत असल्याने व प्रतिवादी नं.१ व २ हयांनी मिळकती चांगल्या व उत्तम प्रतिच्या व पिकांच्या बनविलेल्या असल्याने प्रतिवादी नं.१ व २ हयांचेकडुन काही अवैध आर्थिक लाभ झाला तर पहावा हया दुष्ट हेतुने वादीने सदरचा खोटा व लबाडीचा व बेकायदेशीर व मुदतबाहय दावा व अर्ज प्रतिवादींना त्रास देणेसाठी व खर्चात पाडणेसाठी मे. कोर्टाची दिशाभूल करुन काही हितसंबंधी लोकांचे चिभावणीवरुन सदरचा खोटा व बेकायदेशीर दावा व अर्ज लबाडीने केलेला असल्याने वादीचा दावा व अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

१६. वरील वाद कथनांतून हे न्यायालय खालील मुद्दे विचारार्थ घेत असून त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| *मुददे* | *उत्तरे* |
| --- | --- |
| १ वादी यांनी त्यांचे प्रकरण सकृतदर्शनी सिद्ध केले आहे काय ? | होकारार्थी |
| २ न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने असल्याचे सिद्ध झाले इआहे काय ? | होकारार्थी |
| ३ प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास कोणाचे जास्त नुकसान होण्याचा संभव आहे ? | होकारार्थी |
| ४ आदेश काय ? | निशाणी ५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ ते ३ बाबत :—

१७. वादीचे नियुक्त वकील श्री.एस.एन.थापेकर यांनी असा युक्तिवाद केला की, हक्कसोडपत्र हे अंशतः मिळकतीच्या बाबत होउ शकत नाही. ते फसवुन वादीकडुन प्रतिवादींनी घेतलेले आहे. त्यामुळे हक्कसोडपत्र बेकायदेशीर आहे. या हक्कसोडपत्राचा आधार घेउन प्रतिवादी दावा मिळकतीची विक्री करतील. या कारणास्तव प्रतिवादींना रोकण्याकरिता मनाई हुकूमाची आवश्यकता आहे.

१८. प्रतिवादी क्र.१ व २ चे नियुक्त वकील श्री.बी.एन.वाजे यांनी असा युक्तिवाद केला की, हक्कसोडपत्र हे वर्ष २००८ मधे नोंदणीकृत केलेले आहे. सुमारे ७ वर्षांनी वादी हक्कसोडपत्राबाबत वाद निर्माण करीत आहे. प्रतिवादीचा दावा मिळकतीवर ताबा आहे. हक्कसोडपत्र हे वादीने पुर्ण विचारांती स्वतःच्या कुटूंबाच्या साक्षीने केलेले आहे. त्यामुळे सह हिस्सेदाराला

मनाई हुकूम हक्क सोडल्यानंतर देता येणार नाही.

१९. प्रतिवादी क्रं.४ व ५ चे नियुक्त वकील श्री.डी.एस.खातळे यांनी कोणताही युक्तिवाद सादर केला नाही.

२०. प्रस्तुत दावा हा मुख्यत्वे तीन मिळकतींकरिता दाखल झालेला आहे. गट क्रं.३०६, ३७० व २९९ या मिळकती दावा मिळकती आहेत. दि. ०८.०८.२००८ रोजीचे हक्कसोडपत्र हे गट क्रं.३०६ व ३७० बाबत आहे. तसेच महसुल दस्तऐवजानुसार गट क्रं.३०६ यामधुन वादींचे नांव फेरफार नोंद क्रं.२७८, ३१६, ३०३ व ३५१ नुसार कमी झालेले आहे. तसेच गट क्रं.३७० च्या महसुल दस्तामधे आजही प्रतिवादींचे नांव नमुद आहे. त्यामधे वादीच्या नावाचा उल्लेख नाही. गट क्रं.२९९ यामधे वादी व प्रतिवादी या दोघांचाही नावाचा उल्लेख आहे. सदय परिस्थिती दोन्ही परिस्थितींना मान्य आहे.

२१. वादीचे असे कथन आहे की, दि.०८.०८.२००८ रोजीचे हक्कसोड पत्र वादींना फसवुन प्रतिवादींनी मिळविले. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीचा मुलगा याने साक्षीदार म्हणुन सही केलेली आहे आणि प्रतिवादी क्रं.५ हा वादीला सहायय करीत नाही आणि दस्त मान्य करीत आहे.

२२. हक्कसोडपत्र योग्य आहे किंवा नाही अथवा ते फसवुन घेतले आहे असे कथन हे पुराव्याचा भाग आहे. प्रथमदर्शनी हे पहाणे गरजेचे आहे की, प्रतिवादी यांनी वादी सह हिस्सेदार होती आणि तिने वडिलोपार्जित अंशत: मिळकतीचे हक्कसोड पत्र दिले हे मान्य केलेले आहे.

२३. प्रस्तुत अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादी दावा मिळकतीचे हस्तांतरण करु शकतात त्यामुळे दाव्याच्या मालकी हक्काबाबत व सह हिस्सेदारांच्या अधिकाराबाबत गुंतागुंत निर्माण होउन दाव्याची संख्या वाढु शकते. त्यामुळे मनाई हुकूम न्यायोचीत वाटत आहे. कारण सह हिस्सेदार या नात्याने वादीचा दावा मिळकतीत हक्क आहे किंवा होता हे प्रतिवादीने नाकारलेले नाही. दस्तऐवज बनविणारा व्यक्ती म्हणजेच वादी स्वत: दस्त

नाकारत आहे. वादी स्वतःचे हयातीत स्वतः केलेले हक्कसोड पत्र बेकायदेशीर आहे हे मागणी करीत आहे. त्यामुळे वादी प्रथमदर्शनी सिद्ध करण्यास यशस्वी झालेला आहे की, सह हिस्सेदार या नात्याने त्याचा दावा मिळकतीत हक्क आहे व न्यायाचा समतोल वादीचे पक्षात आहे. त्यामुळे वादी मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरत आहे. या कारणास्तव मुद्दा क्रं.१ ते ३ ची उत्तरे होकारार्थी देण्यात येते.

**मुद्दा क्र. ४ :—**

२४. मुद्दा क्र. १ ते ३ च्या होकारार्थी उत्तरांच्या अनुषंगाने हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांना असे निर्देशित करण्यात येते की, अंतिम आदेश होईपर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये.

३. प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च हा दाव्याच्या खर्चाच्या वेळेस विचाराधीन राहील.

दिनांक ०४.०९.२०१५
इगतपुरी.

(स्व. ना. ढोलम)
दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर)
इगतपुरी.